# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## विद्यार्थी कल्याण व पुरस्कार योजना २०१६-१७

## शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी नवी नियमावली

---

मा. कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांच्या संकल्पनेतून संकुलातील विद्यार्थ्यांसाठी 'विद्यार्थी कल्याण व पुरस्कार योजना'(SWAS) राबविली जाते. शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी ही योजना राबविण्यासंदर्भात दिनांक २१/०३/२०१७ रोजीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे व मा. कुलगुरू महोदयांनी दिनांक २७/०३/२०१७ रोजी तोंडी दिलेल्या निर्देशाप्रमाणे आर्थिक सहाय्य समितीच्या सचिवांनी व सदस्यांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी पुढील नियमावली तयार केली आहे.

१. श्वास अंतर्गत आर्थिक मदतीसाठी निवडलेला विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक नसावा.

२. विद्यापीठाच्या इतर योजनेतून त्यास आर्थिक मदत मिळालेली नसावी.

३. कमवा व शिका योजनेअंतर्गत नियमितपणे काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी. जनसंपर्क कार्यालयाकडून नियमित विद्यार्थ्यांची यादी मागवून घेऊन त्या यादीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व विद्यापीठाच्या इतर योजनेतून आर्थिक मदत मिळालेली आहे का नाही? याची खात्री करून घेऊन कमवा-शिका योजनेअंतर्गत नियमितपणे काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची आर्थिक मदतीसंदार्भातील यादी अंतिम करावी.

४. कला-क्रीडा क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या विद्यार्थ्यांनी आर्थिक मदतीसाठी केलेल्या अर्जाचा विशेष बाब म्हणून विचार करण्यात यावा व मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने आर्थिक उपलब्धता लक्षात घेऊन मदत देण्यात यावी.

५. शुल्क माफीसाठी केलेल्या अर्जांचाही विचार करून मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने आर्थिक उपलब्धता विचारात घेऊन मदत देण्यात यावी.

६. विदेशी विद्यार्थ्यांनी आर्थिक मदतीसाठी केलेल्या अर्जाचा विचार करून गरजू विद्यार्थ्यास मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने आर्थिक उपलब्धता विचारात घेऊन मदत देण्यात यावी.

विद्यार्थी कल्याण व पुरस्कार योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य समितीने तयार केलेल्या या नियमावलीस मा. कुलगुरू महोदयांची मान्यता घेऊन पात्र विद्यार्थांची यादी तयार करावी. तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या यादीस आणि त्यांना दिल्या [जा]णाऱ्या आर्थिक मदतीस मा. कुलगुरू महोदयांची मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्यात यावी.

तथापि, मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेस्तव सादर.

१. डॉ. गोविंद कतलाकुटे –
(वित्त व लेखाधिकारी)

२. डॉ. घन:श्याम येळणे –

३. डॉ. संगीता माकोने – S.R.Makone

४. डॉ. राजेश्वर दुडूकनाळे -

मान्य
27/3/17